पाच पिढ्यांच्या विश्वासाची अखंड परंपरा
माणक ज्वेलर्स
फूलचंद माणकलाल अँण्ड कं.
१९०७, एम.जी.रोड.
चोपडा, जि. जळगाव
पिन-४२५१०७ ९३७०५८१५५३

सुविचार - आपल्या स्वप्नांचा पाठलाग करा; विश्वास ठेवा, एक दिवस ते नक्कीच साकार होतील.

महाराष्ट्राचे निडर दैनिक
# शौर्य मराठी
RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ७५,९८३.३६ -१३५.०३ (०.१८%)
डॉलर ₹ ९६.३४

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ४१ | २९ |
| दिल्ली | ४३ | ३० |
| मुंबई | ३३ | ३० |
| नागपूर | ४४ | ३३ |
| पुणे | ३२ | २४ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | शुक्रवार, दि. २२ मे २०२६ | वर्ष २ रे | अंक १९० | किंमत : ५ रु. | पाने ४

सूर्योदय - सूर्यास्त
स.-५:४८ संध्या-७:०१

सोने - चांदी
सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,५६,०००/- २,६०,०००/-
Rate By : माणक ज्वेलर्स, चोपडा

# पीक कर्जासाठी 'सिबील'ची अट नाही

## मुख्यमंत्री फडणवीसांनी दिले राज्यातील बँकांना आदेश

वृत्तसंस्था । मुंबई

**सरकार ३० जूनपूर्वी कर्जमाफी करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. जूनमध्ये कर्जमाफी झाल्यानंतर शेतकरी पुढच्या वर्षासाठी पात्र राहतील, असेही शेतकऱ्यांना नव्याने कर्ज मिळत नसल्याच्या प्रश्नावर उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले. सरकारचे पैसे जमा झाले नाही तरी एकदा यादी जाहीर केल्यानंतर बँकांनी शेतकऱ्यांना कर्ज द्यावे, असे बँकांना निर्देश देण्यात आले असून, बँकांनी याला सहमती दर्शवल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. शेतकऱ्यांकडे सिबीलची मागणी कोणत्याही बँकेनं करू नये यासंदर्भात सर्व बँकांना सूचना दिल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.**



**खरीप हंगामपूर्व आढावा बैठक**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे राज्यस्तरीय खरीप हंगामपूर्व आढावा बैठक पार पडली. या बैठकीला कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि राज्यस्तरीय बँकर्स समितीचे सदस्य व इतर मान्यवर उपस्थित होते. या आढावा बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत कर्जमाफीसह खरीप हंगामशी निगडीत विविध गोष्टींवर भाष्य केले. यावर्षी दोन आव्हानं समोर असल्याचे फडणवीस म्हणाले. एल निनोमुळे कमी पाऊस आणि जागतिक परिस्थितीमुळे करावे लागणारे खतांचे नियोजन ही दोन आव्हानं यावेळी असणार आहेत, पण या दोन्हीचे योग्य नियोजन करण्याची ग्वाही फडणवीसांनी दिली.

यंदाच्या खरीप हंगामात अल निनोचं संकट आहे, हवामान खात्यानं मांडणी केलीय त्यात सरासरी पाऊस ८८ टक्के असेल असा अंदाज वर्तवला आहे. पश्चिम विदर्भ आणि मराठवाडा, आणि उत्तर महाराष्ट्राचा काही भागात पावसाची तीव्रता जास्त असेल. महाराष्ट्रात सर्वात मोठा हंगाम खरीपाचा असतो. राज्यात खरीपाचे १५२ लाख हेक्टर क्षेत्र आहे. यावर्षी राज्यात उतरत्या क्रमांने पाऊस पडण्याची शक्यता आहे. जूनमध्ये अधिक त्यापेक्षा कमी जुलै, त्यापेक्षा कमी ऑगस्टमध्ये असा प्राथमिक अंदाज आहे. त्यामुळे पावसात अंतर पडण्याची शक्यता असून, त्याचा पिकावर देखील ताण येईल. जलयुक्त शिवाराची कामं वेळेत पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

प्रत्येक जिल्ह्यात आवश्यतेपेक्षा जास्त बियाणं उपलब्ध आहेत, असे फडणवीस म्हणाले. राज्याला २०.१६ लाख मेट्रिक टन बियाणाची आवश्यकता आहे पण आपल्याकडे २८ लाख मेट्रिक टन बियाणं उपलब्ध असल्याचे मुख्यमंत्र्यांनी माध्यमांना सांगितले. राज्यात सोयाबीन, कापूस, तूर, मका, भात, बाजरी इ. पुरेपुर साठा आहे. सर्व बियाणं प्रमाणित असावी यासाठी साथी पोर्टल तयार करण्यात आलं आहे. साथी पोर्टलवर नोंदणीकृत असणारं बियाणंच खरेदी करावंफ्फ, असे आवाहनही मुख्यमंत्री फडणवीसांनी यावेळी केले. यामुळे फसवणुक होणार नाही, असे फडणवीस म्हणाले. खतांच्या पुरवठ्यावर सरकारचं लक्ष असेल अशी ग्वाही फडणवीसांनी दिली. 'जागतिक परिस्थितीमुळे खतांच्या उत्पादनावर अधिक ताण असेल असे सांगताना औद्योगिक क्षेत्रासाठी खतं वळवली जात नाही आहे ना? याकडे लक्ष दिलं जाणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. महाविस्तार ॲप शेतकऱ्यांसाठी एकप्रकारचा कृषीतज्ञ आहे. या ॲपच्या माध्यमातून शेतकऱ्याला विविध प्रकारची मदत मिळणार आहे', असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

### ➤ पीक कर्जासाठी सीबीलची अट नाही

जास्तीजास्त शेतकऱ्यांना कर्ज मिळू शकेल यासाठी नियोजन करण्यात आले आहे. जिल्हा सरकारी आणि ग्रामीण बँका ६७ टक्के शेतकऱ्यांना कर्ज देतात. तर राष्ट्रीयकृत बँका २६ टक्के शेतकऱ्यांना कर्ज देतात. त्यांचं टार्गेट ८० टक्के आहे. त्यांनी ८० टक्क्यांच्या वर टार्गेट पूर्ण केलं पाहिजे, असे फडणवीस म्हणाले. सिबीलची मागणी कोणत्याही बँकेनं करू नये, यासंदर्भात सर्व बँकांना सूचना दिल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. प्रत्येक शाखेला पीक कर्जासाठी सीबीलची अट नाही हे स्पष्ट आदेश काढले आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

# पुलवामा हल्ल्याचा मास्टरमाईंड हमजा बुरहान ठार

## पाकिस्तानातच अज्ञात व्यक्तीने केली हत्या

वृत्तसंस्था । इस्लामाबाद




**भारतात २०१९ साली पुलवामा येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात केंद्रीय राखीव पोलीस दलातील ४० जवानांचा मृत्यू झाला होता. या हल्ल्याचा मास्टरमाईंड हमजा बुरहानची पाकव्याप्त काश्मीरमध्ये अज्ञाताकडून हत्या करण्यात आली आहे.**

डॉक्टर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या हमजाला अज्ञात बंदुकधाऱ्याने अनेक गोळ्या झाडल्या. मुझफ्फराबाद येथे झालेल्या हल्ल्यात हमजा मारला गेला. पुलवामाचा रहिवासी असलेल्या हमजाला केंद्रीय गृहमंत्रालयाने २०२२ साली दहशतवादी म्हणून घोषित केले होते. पाकिस्तानचे समर्थन असलेल्या अल-बद्र या संघटनेच्या कामात त्याचा सक्रिय सहभाग होता. तर पुलवामा हल्ल्यात त्याची महत्त्वाची भूमिका होती, असे सांगितले जाते. हमजाच्या हत्येमुळे जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादाचा प्रचार, अतिरेक्यांची भरती आणि त्यांच्या साखळीला मोठा धक्का बसला आहे.

बुरहानचे खरे नाव अर्जुमंद गुलझार दार असे होते. पुलवामाच्या रत्नीपोरा भागातील खरबतपोरा येथे त्याचा जन्म झाला होता. २०१७ साली उच्च शिक्षणाच्या नावाखाली तो पाकिस्तानला गेला होता. पुढे तो बंदी घातलेली अतिरेकी संघटना अल-बद्रमध्ये सामील झाला आणि या संघटनेच्या कमांडर पदावर पोहोचला. काश्मीरमध्ये परतल्यानंतर बुरहानने तरुणांमध्ये कट्टरपंथी विचार पसरविण्यास आणि त्यांच्यावर प्रभाव टाकण्यास सुरुवात केली. दक्षिण काश्मीरच्या पुलवामापासून ते सोपियान पर्यंत (पान २ वर)

## थोडक्यात

### जगावर पुन्हा मोठं आरोग्य संकट!



**नवी दिल्ली ।** अफ्रिका खंडात वाढत असलेल्या इबोला विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर भारत-अफ्रिका फोरम शिखर परिषद पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. भारत सरकार आणि आफ्रिकन युनियन यांच्यातील चर्चेनंतर हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाने गुरुवारी दिली. केंद्र सरकारने इबोलाच्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर उच्च जोखमीच्या देशांतून भारतात येणाऱ्या प्रवाशांसाठी बंदरे, विमानतळे आणि सीमावर्ती तपासणी केंद्रांवर विशेष आरोग्य सल्ला जारी केला आहे. परिषदेत सुमारे ४० देशांतील प्रतिनिधी सहभागी होणार होते. त्यापैकी काही देशांना इबोला संसर्गाच्या पार्श्वभूमीवर उच्च जोखीम श्रेणीत समाविष्ट करण्यात आले आहे.

### हार्दिक पंड्यावर बीसीसीआयची कारवाई!

**मुंबई ।** हार्दिक पंड्याच्या नेतृत्त्वाखाली मुंबई इंडियन्सला केकेआरविरूद्ध सामन्यात पराभवाला सामोरं जावं लागलं. ईडन गार्डन्सच्या मैदानावर झालेल्या या सामन्यात केकेआरने मुंबईवर ४ विकेट्सने विजय मिळवला. या विजयासह केकेआरचा संघ प्लेऑफच्या शर्यतीत कायम असून त्यांनी पंजाब किंग्सची बरोबरी केली आहे. पण या सामन्यानंतर आता बीसीसीआयने हार्दिक पंड्यावर कारवाई केली आहे.

### प. बंगालमधील मदरशांत 'वंदे मातरम' बंधनकारक

**कोलकाता ।** पश्चिम बंगालमधील ममता बॅनर्जी यांच्या सत्तापालटानंतर मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने राज्यात एकापाठोपाठ एक मोठे निर्णय घेण्यास सुरुवात केली आहे. शाळांमध्ये 'वंदे मातरम' गीत अनिवार्य केल्यानंतर, आता राज्य सरकारने हा निर्णय आणखी पुढे नेत राज्यातील सर्व मान्यताप्राप्त मदरसांमध्येही राष्ट्रीय गीतगायन बंधनकारक केले आहे.

# सुरत-अमरावती एक्स्प्रेसचे अत्याधुनिक एलएचबी कोचमध्ये रूपांतरांचा निर्णय

प्रतिनिधी । जळगाव

**खान्देशातील रेल्वे प्रवाशांसाठी अत्यंत महत्त्वाची आणि दिलासादायक बातमी समोर आली असून, पश्चिम रेल्वे प्रशासनाने २०९२५/२६ सुरतअमरावती एक्स्प्रेसचे अत्याधुनिक एलएचबी कोचमध्ये रूपांतर करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. येत्या २८ मेपासून ही गाडी नव्या रेकसह धावणार आहे. या निर्णयामुळे हजारो प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी आणि वेगवान रेल्वे प्रवासाचा लाभ मिळणार असल्याने समाधानाची भावना व्यक्त होत आहे.**



सध्या भारतीय रेल्वेकडून जुन्या आयसीएफ कोचच्या जागी टप्प्याटप्प्याने एलएचबी डबे वापरण्यावर भर दिला जात आहे. जर्मन तंत्रज्ञानावर आधारित हे डबे अधिक सुरक्षित, मजबूत आणि आधुनिक सुविधांनी सुसज्ज मानले जातात. विशेषतः लांब पल्ल्याच्या गाड्यांमध्ये एलएचबी कोचमुळे प्रवास अधिक स्थिर आणि कमी धक्कादायक होतो. उच्च वेगातही डबे अधिक संतुलित राहतात. त्यामुळे रेल्वेचा वेग वाढण्यास मदत होते. प्रवाशांना आरामदायी प्रवासाचा अनुभव मिळतो. अपघाताच्या वेळी डबे एकमेकांवर चढण्याची शक्यता कमी असल्याने सुरक्षा दृष्टीनेही हे डबे अधिक प्रभावी मानले जातात. नव्या रचनेनुसार २०९२५/२६ सुरतअमरावती एक्स्प्रेसमध्ये १ एसी चेयर कार, ४ सेकंड सिटिंग चेयर कार, २ स्लीपर कोच, ७ जनरल कोच, १ एसएलआर आणि १ जनरेटर कोचचा समावेश असणार आहे. त्यामुळे सर्वसामान्य प्रवासी, मध्यमवर्गीय नागरिक तसेच आरक्षित प्रवाशांसाठी अधिक सक्षम सुविधा उपलब्ध होणार आहेत.

खान्देशातील शिंदखेडा, धरणगाव, जळगाव, भुसावळ तसेच (पान २ वर)

# मराठा समाजासाठी अण्णासाहेब पाटील महामंडळाला १५० कोटींचा निधी

वृत्तसंस्था । मुंबई

**मराठा समाजाचे आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आमरण उपोषणाचा इशारा दिला असतानाच सरकारने समाजासाठी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. सरकारने अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाला १५० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.**



नियोजन विभागाकडून यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला असून पहिल्या टप्प्यात हा निधी वितरित करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे मराठा समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास आणि सुशिक्षित बेरोजगार युवकांना मोठा आधार मिळणार आहे. राज्य सरकारने २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळासाठी एकूण ७५० कोटी रुपयांची तरतूद केली होती. त्यापैकी यापूर्वी ३०० कोटी रुपयांचा निधी वर्ग करण्यात आला होता. आता आणखी १५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. शासनाच्या नियमावलीनुसार हा निधी खर्च करताना सर्व वित्तीय नियम आणि अटींचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. निधीचा गैरवापर होणार नाही याची विशेष दक्षता घेण्याचे आदेशही संबंधित विभागांना देण्यात आले आहेत. या माध्यमातून राज्यातील युवकांना व्यवसाय उभारण्यासाठी आणि स्वतःच्या (पान २ वर)

# त्र्यंबकेश्वरमध्ये पाण्यासाठी महिलांचा हंडा मोर्चा

वृत्तसंस्था । नाशिक

**त्र्यंबकेश्वर तालुक्यातील मुळेगाव येथील तीव्र टंचाईच्या प्रश्नावर भारतीय महिला फेडरेशन आणि आयटक कामगार संघटना यांच्या वतीने जिल्हा परिषदेच्या कार्यालयावर रिकामे हंडे घेऊन मोर्चा काढण्यात आला. मोर्चेकऱ्यांनी प्रवेशद्वारावर निदर्शने करत ठिय्या दिला. आंदोलनाची दखल घेत प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी प्रतिभा संगमनेर यांनी तातडीने अधिकाऱ्यांची बैठक घेऊन उपाययोजनांचे निर्देश दिले.**




मुळेगावातील महिलांना अनेक दशकांपासून पिण्याच्या पाण्यासाठी सुमारे दीड किलोमीटरवरील विहिरींवर अवलंबून राहावे लागत आहे. महिलांचे दररोज दोन ते चार तास पाणी आणण्यासाठीच जात आहेत. विहिरीतील दूषित पाण्यामुळे जलजन्य आजार वाढले असून आतापर्यंत चार महिला आणि मुलींचा विहिरीत पडून मृत्यू झाला आहे. आंदोलक महिलांनी 'आम्ही सरकारच्या लाडक्या बहिणी नाहीत का? आम्हाला स्वच्छ पाणी का मिळत नाही?'असे प्रश्न केले. पाण्याच्या (पान २ वर)

# अमेरिकेत भारतीय इंजिनिअर्सवर संकट

## मेटा, ॲमेझॉनमध्ये मोठ्याप्रमाणावर नोकरकपात, १ व्हिसाधारकांना ६० दिवसांचा अल्टिमेट

वृत्तसंस्था । वॉशिंग्टन

**अमेरिकेच्या आयटी क्षेत्रात आलेल्या नोकरी कपातीच्या नव्या लाटेमुळे हजारो भारतीय इंजिनिअर्स आणि सॉफ्टवेअर डेव्हलपर्सचे भविष्य धोक्यात आले आहे. जे भारतीय गेल्या अनेक वर्षांपासून अमेरिकेत स्थायिक झाले होते, ज्यांनी तिथे घरे विकत घेतली होती आणि त्यांच्या कुटुंबासह आनंदाने राहत होते, त्यांच्यासाठी कंपनीचा एक ईमेल सर्व काही क्षणात उद्ध्वस्त करणारा ठरत आहे.**




मेटा, ॲमेझॉन आणि लिंक्टइन यांसारख्या दिग्गज कंपन्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि ऑटोमेशनमुळे मोठ्या प्रमाणावर नोकरकपात करत आहेत. भारतीय कर्मचाऱ्यांसाठी ही नोकरी गेल्याने आर्थिक नुकसान होतेच, शिवाय अमेरिकेतून जाण्याचा विचारही करावा लागणार आहे. दरम्यान, अमेरिकेत काम करणारे बहुतांश भारतीय आयटी व्यावसायिक एच-१बी व्हिसावर कार्यरत आहेत. हा व्हिसा थेट त्यांच्या नोकरी देणाऱ्या कंपनीशी जोडलेला आहे. त्यामुळे नोकरी गेली तर त्यांच्यासमोर वेळेचे मोठे आव्हान उभे राहिल. अमेरिकन इमिग्रेशन नियमांनुसार, नोकरी गमावलेल्या एच-१बी कर्मचाऱ्यांना नवीन नोकरी शोधण्यासाठी किंवा व्हिसा पुन्हा परत करण्यासाठी ६० दिवसांचा ग्रेस पिरियड मिळतो. जो कर्मचाऱ्याच्या कामाच्या शेवटच्या दिवसापासून सुरू होतो.

**कुटुंब आणि भविष्यावर मोठा परिणाम**

सध्याच्या मंदीच्या आणि संथ भरतीच्या काळात, दोन महिन्यांचा हा कालावधी खूपच वेगाने निघून जातो. जर या कालावधीत नवीन नोकरी मिळाली नाही, तर त्यांना अमेरिकेतून बाहेर पडावे लागते.

# काँग्रेसच्या नवीन जिल्हाध्यक्ष नियुक्तीला निष्ठावंतांचा विरोध

## जळगाव जिल्ह्यातील अनेक कार्यकर्त्यांसह पदाधिकारी राजीनामे देणार?; पक्षांतर्गत असंतोषाची पडली ठिणगी

प्रतिनिधी । जळगाव

**शहरासह जिल्हा काँग्रेसमध्ये नव्याने जाहीर करण्यात आलेल्या तिन्ही जिल्हाध्यक्षांच्या नियुक्तीनंतर पक्षातील अंतर्गत नाराजी नाट्य आता उघड झाले असून पक्ष संघटनेत असंतोषाची ठिणगी पडली आहे. काही जुन्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदाचा पक्षश्रेष्ठींकडे राजीनामा देण्याची तयारी केली आहे. ज्यामध्ये धरणगावचे तालुकाध्यक्ष डॉ. व्ही. डी. पाटील यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा समावेश आहे.**




काँग्रेसने जळगाव पूर्वसाठी धनंजय चौधरी, जळगाव पश्चिमसाठी अविनाश भालेराव आणि जळगाव शहरासाठी जमील शेख यांची जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती जाहीर केल्यानंतर अनेक जुन्या व निष्ठावान कार्यकर्त्यांनी या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर धरणगाव काँग्रेसचे तालुकाध्यक्ष व्ही.डी.पाटील यांनी पक्ष नेतृत्वावर गंभीर स्वरूपाचे आरोप केले आहेत.

धरणगाव तालुकाध्यक्षपदाचा राजीनामा देण्याच्या तयारीत असलेल्या पाटील यांनी आपल्या निवेदनातून पक्षाच्या निर्णय प्रक्रियेवर तीव्र शब्दांत टीका करताना सामाजिक समतोल राखण्यात पूर्णपणे अपयश आल्याचा आरोप केला आहे. जिल्हाध्यक्षांची निवड कोणत्या निकषांवर करण्यात आली, नियुक्त्यांपूर्वी कोणते मूल्यमापन करण्यात आले आणि या नावांसाठी शिफारस कोणी केली? याचा खुलासा पक्षश्रेष्ठींनी जनतेसमोर करावा, अशीही मागणी त्यांनी केली आहे.

वरिष्ठांकडून लादलेले जिल्हाध्यक्ष आम्हाला मान्य नाहीत, असे स्पष्ट शब्दांत सांगत त्यांनी पक्ष संघटनेतील लोकशाही प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. पक्षासाठी अनेक वर्षे सातत्याने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना डावलून केवळ विशिष्ट गटांना पदे दिली जात असल्याचा आरोप करत पाटील यांनी पक्षातील वाढत्या गटबाजीवरही निशाणा साधला आहे. देशावरील संकट पाहून आम्ही रक्त जाळून पक्षाचे काम करत होतो. मात्र पक्षाने सुधारणा करायचीच नाही, असे ठरवले असेल तर नाईलाज आहे, अशा शब्दांत त्यांनी (पान २ वर)

# शासकीय परिचारिकांचे बदली धोरणाविरोधात राज्यभर तीव्र आंदोलन

वृत्तसंस्था । मुंबई

राज्यातील शासकीय रुग्णालयातील नर्स अर्थात परिचारिका यांचे कार्य लक्षवेधी आहे. कोविड काळात याच परिचारिका देवदूत म्हणून धावून आल्या होत्या. अनेकांचे प्राण या परिचारिकांनी केलेल्या रुग्णसेवेमुळे वाचलेले आहे. त्या परिचारिकांच्या बदल्या त्या सध्या काम करीत असलेल्या ठिकाणापासून इतरत्र दुसऱ्या शासकीय रुग्णालयात करण्याचा निर्णय शासन घेत आहे. त्यामुळे घर संसार मुलांचे शिक्षण सांभाळून नोकरी करणाऱ्या परिचारिकांची तारांबळ उडणार आहे. अशा परिचारिकांच्या अंतर्गत होणाऱ्या बदल्या याच बदल्या गृहीत धरून त्यांची इतरत्र बदल्या करू नयेत अशी मागणी होत आहे. त्यासाठी राज्यभर लक्षावधी आंदोलन करण्यात आले. महाराष्ट्र गव्हर्मेंट नर्सेस फेडरेशनच्या वतीने मुंबईसह राज्यभर सर्व वैद्यकीय शिक्षण विभागाअंतर्गत शासकीय रुग्णालयातील बदली धोरणाविरोधात तीव्र निदर्शने करण्यात आली. या लक्षवेध आंदोलनामध्ये परिचारिकांनी बदली धोरणाविरोधात निदर्शने करून आपला असंतोष व्यक्त केला.

## संपादकीय

### पायाभूत सुविधांवरील ताण

लोकसंख्या वाढ, स्थलांतर, पाणीटंचाई आणि शहरी व्यवस्थेवरील ताण हा आजच्या भारतातील अत्यंत गंभीर आणि वास्तव प्रश्न आहे. शहरांची लोकसंख्या भरमसाठ वाढल्यामुळे पायाभूत सुविधा आणि संसाधनांवर ताण येतो. स्थलांतरितांना यासाठी कारणीभूत मानले जाते. या मुद्द्याचा चहुबाजूने विचार करणे आवश्यक आहे. विशेषतः मोठ्या शहरांमध्ये रोजगार, शिक्षण, उद्योग आणि चांगल्या जीवनमानाच्या शोधात विविध राज्यांतून मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होत असते. त्यामुळे पाणी, निवास, वाहतूक, आरोग्य आणि सार्वजनिक सेवांवर मोठा दबाव निर्माण होतो.या पार्श्वभूमीवर स्थानिक संसाधनांवर वाढता ताण ही चिंता काही प्रमाणात रास्त मानली जाऊ शकते. मात्र या विषयाकडे परप्रांतीय मुक्त महाराष्ट्र अशा भावनिक घोषणांपेक्षा घटनात्मक, सामाजिक, आर्थिक आणि मानवी दृष्टिकोनातून संतुलितपणे पाहणे आवश्यक ठरते. भारताची राज्यघटना प्रत्येक भारतीय नागरिकाला देशात कुठेही राहण्याचा, रोजगार करण्याचा आणि स्थलांतर करण्याचे स्वातंत्र्य देते. भारतीय राज्यघटनेच्या कलम १९ नुसार प्रत्येक नागरिकाला भारताच्या कोणत्याही भागात मुक्तपणे फिरण्याचा आणि स्थायिक होण्याचा अधिकार आहे. त्यामुळे परप्रांतीय मुक्त महाराष्ट्र किंवा एखाद्या राज्यातून दुसऱ्या राज्यातील लोकांना बाहेर ठेवण्याची भूमिका ही घटनात्मक चौकटीत मान्य होऊ शकत नाही. भारत हे संघराज्य असले तरी प्रत्येक राज्य हे स्वतंत्र राष्ट्र नसून भारतीय संघराज्याचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, दिल्ली किंवा तामिळनाडू ही सर्व राज्ये भारतीय नागरिकांसाठी समान आहेत. तथापि, स्थलांतरामुळे निर्माण होणाऱ्या स्थानिक अडचणी पूर्णपणे दुर्लक्षितही करता येत नाहीत. मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक किंवा नागपूरसारख्या शहरांमध्ये वाढती लोकसंख्या ही वास्तव समस्या आहे. पाण्याची मागणी झपाट्याने वाढते, पण धरणे, जलस्रोत आणि वितरण व्यवस्था मर्यादितच राहते. परिणामी अनेक भागांत पाणी कमी दाबाने मिळणे, अनियमित पुरवठा, टँकर संस्कृती वाढणे आणि भूजल पातळी घटणे अशा समस्या निर्माण होतात. याशिवाय सांडपाणी व्यवस्थापन, नदीप्रदूषण, अनधिकृत बांधकामे आणि झपाट्याने वाढणारी वस्ती यांमुळे पर्यावरणीय ताण अधिक वाढतो. त्यामुळे पाणी मर्यादित आहे पण लोकसंख्या मर्यादित नाही ही चिंता काही अंशी वस्तुस्थिती दर्शवते. परंतु या समस्येचे संपूर्ण खापर केवळ स्थलांतरितांवर फोडणे हे वास्तवाला धरून नाही. कारण पाणीटंचाईची कारणे बहुआयामी आहेत. शहर नियोजनातील त्रुटी, जलव्यवस्थापनातील भ्रष्टाचार, पाण्याची गळती, अनियंत्रित बांधकामे, औद्योगिक वापर, हवामान बदल, पावसातील अनियमितता, नद्यांचे प्रदूषण आणि प्रशासनातील दीर्घकालीन नियोजनाचा अभाव हीदेखील तितकीच मोठी कारणे आहेत. अनेक शहरांत ३० ते ४० टक्के पाणी गळतीतून वाया जाते. पावसाचे पाणी साठवणूक, पुनर्वापर आणि जलसंवर्धन याकडे पुरेसे लक्ष दिले गेलेले नाही. त्यामुळे समस्या फक्त बाहेरून आलेल्या लोकांमुळे निर्माण झाली असे म्हणणे व्यवहार्यदृष्ट्या पूर्ण सत्य मानता येणार नाही. याशिवाय स्थलांतरित लोक हे फक्त संसाधने वापरणारे नसतात; ते अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे घटकही असतात. बांधकाम, उद्योग, वाहतूक, सेवा क्षेत्र, हॉटेल व्यवसाय, घरगुती कामे, आयटी क्षेत्र, लघुउद्योग आणि अनेक महत्त्वाच्या कामांमध्ये स्थलांतरितांचे योगदान मोठे असते. महानगरांची अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर विविध राज्यांतील कामगार आणि कौशल्याधारित मनुष्यबळावर उभी आहे. त्यामुळे स्थलांतर पूर्णपणे रोखणे हे व्यवहार्य किंवा आर्थिकदृष्ट्या हिताचे ठरणार नाही. लोंढे रोखा, महाराष्ट्र वाचवा अशा घोषणा लोकांच्या असुरक्षिततेची भावना व्यक्त करू शकतात; परंतु त्यातून सामाजिक दुफळी आणि प्रादेशिक वैमनस्य वाढण्याचा धोका असतो. पाणीटंचाईसारख्या गंभीर प्रश्नाला जातीय किंवा प्रांतीय संघर्षाचे रूप मिळाल्यास सामाजिक सलोखा बिघडू शकतो. स्थानिक नागरिक आणि स्थलांतरित यांच्यात तणाव वाढल्यास कायदा–सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे जनजागृती करताना घटनात्मक मूल्यांचा आदर अत्यंत आवश्यक आहे.

# शेतकरी संघ निवडणुकीत तिरंगी लढत निश्चित

## सर्वपक्षीय स्तरावर बिनविरोध निवडीचा प्रयत्न फसला; खासदार–आमदार आमने–सामने

**प्रतिनिधी । अमळनेर**

**अमळनेर तालुका शेतकरी सहकारी संघाच्या होऊ घातलेल्या निवडणुकीत अखेर तिरंगी लढतीचे चित्र स्पष्ट झाले आहे. निवडणूक बिनविरोध करण्यासाठी सर्वपक्षीय स्तरावर प्रयत्न करण्यात आले. मात्र, जागा वाटपाचा तिढा न सुटल्याने हे प्रयत्न असफल ठरले. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप आणि काँग्रेस हे तिन्ही पक्ष स्वतंत्रपणे निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत.**




या निवडणुकीसाठी एकूण १५५ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. दि. २० मे रोजी अर्ज माघारीच्या अखेरच्या दिवशी तब्बल १११ उमेदवारांनी माघार घेतली. त्यामुळे आता १५ जागांसाठी ४४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उरले आहेत. अर्ज माघारीच्या अंतिम दिवशी सकाळपासून राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप आणि काँग्रेस या तिन्ही पक्षांकडून सर्वपक्षीय पॅनल उभे करून निवडणूक बिनविरोध करण्यासाठी हालचाली सुरू होत्या. मात्र, उमेदवारांची संख्या अधिक असल्याने तसेच जागा वाटपावर एकमत न झाल्याने अखेर सर्वपक्षीय पॅनलचा प्रस्ताव बारगळला. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी मंत्री तथा आमदार अनिल भाईदास पाटील यांच्या नेतृत्वाखाली सहकार पॅनल मैदानात उतरले असून या पॅनलमध्ये सर्व १५ जागांसाठी उमेदवार देण्यात आले आहेत. तर भाजपच्या खासदार स्मिता वाघ यांच्या नेतृत्वाखाली किसान विकास पॅनल जाहीर करण्यात आले आहे. या पॅनलने १४ उमेदवार रिंगणात उतरवले असून महिला राखीव गटात केवळ एक उमेदवार देण्यात आला आहे. याशिवाय काँग्रेस पक्षाने शेतकरी पॅनलची घोषणा केली असून या पॅनलने सोसायटी मतदारसंघात उमेदवार न देता एकूण १० उमेदवार उभे केले आहेत. अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर ही निवडणूक होत असल्याने अमळनेर तालुक्यात या निवडणुकीकडे विशेष लक्ष लागले आहे. शेतकरी संघ हा शेतकऱ्यांच्या हितासाठी स्थापन झालेला संघ असून या निवडणुकीत तळागाळातील खरा कार्यकर्ता निवडून यावा, अशी भावना शेतकरी व नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सहकार पॅनल**

व्यक्तीशः मतदार संघः शिसोदे अनिल शिवदास (डांगरी), पाटील संजय पुनाजी (पिंपळे), बागुल दिपक जगतराव (मंगरुळ), पाटील चंद्रकांत वसंत (पिंगळवाडे), पाटील संभाजी लोटन (लोणसिम), सोसायटी मतदार संघ : पाटील सचिन बाळू (अंतुर्ली), भामरे गणेश धर्मराज (बाह्मणे), पाटील नितीन बापुराव (गडखांब), पाटील संजय त्र्यंबक (चौबारी), पाटील पंकज शांताराम (निमझरी), महिला राखीव मतदार संघ : पाटील मालुबाई बापुराव (झाडी), देसले सुषमा वासुदेव (दहिवद), ओबीसी मतदार संघ : पाटील विक्रांत भास्कर (अमळनेर), व्हि.जे.एन.टी. मतदार संघ : पाटील रणजित भिमसिंग (अमळनेर),अनुसुचित जाती/जमाती मतदार संघ : बैसाणे शंकर बंडु (देवगांव–देवळी) आदी उमेदवार रिंगणात आहेत.

**भाजप किसान विकास पॅनल**

व्यक्तीशः मतदार संघ : बंडू लक्ष्मण पाटील (सोनखेडी), भिका पिरण पाटील (निसर्डी), संजय माधवराव पाटील (भरवस), चंद्रकांत श्रीराम पाटील (गलवाडे), गिरीश सोनजी पाटील (अमळगाव), सोसायटी मतदार संघ : प्रफुल्ल हिरालाल पवार (मालपूर), जितेंद्र दिनकर पाटील (फापोरे), सुदर्शना राजेंद्र पाटील (रामेश्वर), महेंद्र सुदाम महाजन (अमळनेर), महेश प्रभाकर देशमुख (गांधली), महिला राखीव मतदार संघ : कल्याणी दिनेश साळुंखे (मारवड), ओबीसी मतदार संघ : डॉ. अनिल नथु शिंदे (पिळोदे), व्हि. जे.एन.टी. मतदार संघ : किरणगीर भरतगीर गोसावी (नगाव), अनुसुचित जाती/जमाती मतदार संघ : श्रावण सदा ब्रह्मे (हेडावे), तर **शेतकरी पॅनल (काँग्रेस)चे व्यक्तीशः मतदार संघ :** प्रा. सुभाष सुकलाल पाटील (शिरूड), सुरेश पिरन पाटील (निंभोरा), भागवत किशोर सुर्यवंशी (खवशी), प्रा. श्याम साहेबराव पवार (खेडी), गिरीष प्रकाश पाटील (लोण), महिला राखीव मतदार संघ : श्रीमती सुनिता विनायक पाटील, श्रीमती सिंधुबाई प्रताप पाटील (फापोरे), ओबीसी मतदार संघ : दिनेश उत्तमराव पवार, व्हि. जे.एन. टी.मतदार संघ : भागवत बन्सीलाल आसाराम (लोंढवे), अनुसुचित जाती/जमाती मतदार संघ : सुर्यवंशी ताराचंद सिताराम आदी उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहे.

गरिबांचे पुनर्वसन करा; अन्यथा मोहीम थांबवा, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना निवेदन

## अतिक्रमण हटाव मोहिमेविरोधात फारूख शाह आक्रमक

**प्रतिनिधी । धुळे**

**शहरातील अतिक्रमण निष्कासन मोहिमेमुळे गरीब, दलित, मुस्लिम व आदिवासी समाज उघड्यावर येत असल्याचा आरोप करत माजी आमदार शाह फारूख अन्वर यांनी राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांना निवेदन देवून तातडीची दखल घेण्याची मागणी केली आहे.**



धुळे जिल्हा प्रशासन व महापालिकेकडून देवपूर सुशी नाला परिसरासह स्टेशन रोड आणि शहरातील विविध भागात अतिक्रमण हटाव मोहीम राबविली जात असून, पावसाळ्याच्या तोंडावर नागरिकांना नोटिसा देण्यात येत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अनेक कुटुंबे ५० ते ७० वर्षांपासून वास्तव्यास असूनही शासनाच्या २५ मार्च २०२६ च्या धोरणानुसार सर्वेक्षण व पुनर्वसन न करता कारवाई केली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. शाह फारूख अन्वर यांनी शासनाच्या जागेवर तात्काळ पुनर्वसन करावे किंवा ज्या ठिकाणी नागरिक वास्तव्यास आहेत, त्याच ठिकाणी पुनर्वसनाची व्यवस्था करावी, अशी मागणी केली आहे. पुनर्वसनाशिवाय सुरू असलेल्या मोहिमेमुळे शेकडो कुटुंबे बेघर झाली असून शासनाची प्रतिमा मलीन होत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. धुळे प्रशासन व महापालिकेला तात्काळ कारवाई थांबविण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

## सर्वसमावेशक विकासकामांची अंमलबजावणी करा

राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य प्रियांक कानुगो यांनी घेतला आढावा

**प्रतिनिधी । नंदुरबार**

**राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, नवी दिल्लीचे सदस्य प्रियांक कानूगो यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समिती सभागृह येथे मानवाधिकार आयोग आणि सर्वसमावेशक विकासाशी संबंधित जिल्ह्यातील प्रमुख अधिकाऱ्यांची आढावा बैठक संपन्न झाली.**



या बैठकीय जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी, जिल्हा पोलीस अधिक्षक अश्विनी सानप, तसेच विविध विभागाचे अंमलबजावणी अधिकारी यावेळी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी सुरुवातीस नंदुरबार जिल्ह्याची भौगोलिक, आर्थिक, शैक्षणिक, आरोग्य, रस्ते, जिल्ह्यात सुरु असलेल्या ०० महत्वाच्या कामांची व येणाऱ्या अडीअडचणीबाबत माहिती दिली. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य प्रियांक कानूनगो यांनी यावेळी, बालकांचे हक्क आणि बाल न्याय व्यवस्था, जिल्हा परिषद शिक्षण विभाग, आदिवासी विकास शिक्षण विभाग, दिव्यांग व्यक्तींचे हक्क, ज्येष्ठ नागरिकांचे हक्क, पंचायती राज संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे कामकाज, आरोग्य, रोजगार आणि कौशल्य विकास, मानवी तस्करी, क्रीडा आणि मानवाधिकार, युवा व्यवहार, सांस्कृतिक, तात्विक आणि कलात्मक अभिव्यक्तींमधील मानवाधिकार, बाल लैंगिक शोषण आदि विषयांचा आढावा घेतला. मानवाधिकार आयोग आणि सर्वसम विशक विकासाशी संबंधित विषयात्मक क्षेत्रांबाबत अंमलबजावणी तसेच केंद्र आणि राज्य सरकारच्या कल्याणकारी योजना आणि लागू असलेले संबंधित नवीन कायदे, नियम यांची काटेकारपणे अंम लबजावणी करण्याच्या संबंधित अधिकाऱ्यांना सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

## पान १ वरुन

**काँग्रेसच्या नवीन जिल्हाध्यक्ष......**

आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. तळागाळात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या योगदानाची दखल घेतली जात नसल्याने प्रामाणिक कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड नाराजी असल्याचेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. व्ही. डी. पाटील यांनी पक्ष नेतृत्वावर आणखी टीका करताना म्हटले की, पक्षासाठी तन, मन आणि धन अर्पण करून काम करणाऱ्यांना दुर्लक्षित केले जाते. तर दुसरीकडे अनेक वर्षे पक्षात राहून कोणतेही उल्लेखनीय काम न करणाऱ्यांना महत्त्वाची पदे दिली जात आहेत. ज्यांनी कधीच संघटन उभारणीसाठी मेहनत घेतली नाही, अशा लोकांना निर्णय प्रक्रियेत महत्त्व दिले जात आहे. त्यामुळे काँग्रेसमध्ये काम करणाऱ्या जुन्या निष्ठावान कार्यकर्त्यांमध्ये निराशेचे वातावरण असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

**सुरत–अमरावती एक्स्प्रेसचे......**

परिसरातील हजारो प्रवासी नियमितपणे सुरत, नंदुरबार, भुसावळ, अकोला आणि अमरावतीकडे प्रवास करतात. व्यापारी, विद्यार्थी, नोकरीसाठी प्रवास करणारे कर्मचारी तसेच वैद्यकीय कारणांसाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी आहे. या पार्श्वभूमीवर सुरतअमरावती एक्स्प्रेसमध्ये आधुनिक एलएचबी डबे उपलब्ध होणे ही प्रवाशांसाठी मोठी सुविधा मानली जात आहे. विशेषतः सुरतमधील उद्योग धंद्यांमध्ये कार्यरत असलेल्या खान्देशातील कामगार वर्गासाठी हा बदल अधिक महत्त्वाचा ठरणार आहे. वाढत्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर जनरल आणि सेकंड सिटिंग डब्यांची संख्या कायम ठेवण्यात आल्याने सर्वसामान्य प्रवाशांनाही मोठा दिलासा मिळणार आहे. या निर्णयामुळे खान्देशातील रेल्वे सुविधांच्या विकासाला चालना मिळणार असल्याची प्रतिक्रिया विविध प्रवासी संघटनांकडून व्यक्त होत आहे. डीआरयूसीसी सदस्य महेंद्र कोठारी तसेच धरणगाव तालुका प्रवासी मंडळाने पश्चिम रेल्वे प्रशासन आणि खासदार स्मिता वाघ यांचे आभार मानले आहेत.

**पुलवामा हल्ल्याचा मास्टरमाईंड......**

त्याने त्याचे जाळे पसरवले होते. पुलवामामधील अनेक कुटुंबानी सांगितले की, बुरहानच्या संपर्कात आलेले तरूण दहशतवादाकडे वळू लागले होते. जम्मू–काश्मीरमधील अनेक दहशतवादी कारवायांशी बुरहान संबंधित होता. तसेच १४ फेब्रुवारी २०१९ रोजी पुलवामा येथील हल्ल्यातही त्याचा सहभाग होता. जैश–ए–मोहम्मद या संघटनेकडून २०१९ साली सीआरपीएफच्या ताफ्यावर भीषण हल्ला करण्यात आला होता. ज्यात ४० जवानांना प्राण गमवावे लागले होते. पुलवामा येथील हल्ल्यानंतर भारतीय हवाई दलाने बालाकोट आणि पाकिस्तानमध्ये सर्जिकल स्ट्राईक करत या हल्ल्याला प्रत्युत्तर दिले होते. पुलवामा येथे हल्ला करणाऱ्या अतिरेक्यांना बुरहानने स्फोटके आणि ग्रेनेड पुरवल्याची माहिती सुरक्षा दलांनी दिली होती. १८ नोव्हेंबर २०२० मध्ये सीआरपीएफ जवानांवर झालेल्या ग्रेनेड हल्ल्यातही त्याची महत्त्वाची भूमिका होती.

**मराठा समाजासाठी अण्णासाहेब......**

पायावर उभे राहण्यासाठी मदत मिळणार आहे. महामंडळाला निधी टप्प्याटप्प्याने दिला जातो. मंजूर निधीपैकी २० टक्के, ३० टक्के, ४० टक्के आणि ५० टक्के अशा स्वरूपात निधीचे वितरण करण्यात येते. संबंधित निधी खर्च झाल्यानंतर त्याचा अहवाल नियोजन विभागाकडे सादर करावा लागतो. त्यानंतर पुढील टप्प्यातील निधी मंजूर केला जातो. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे मराठा समाजातील नव्या उद्योजकांना आधार मिळणार आहे. मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी ३० मे पासून आंदोलनाचा इशारा दिला आहे. सरकारकडून आश्वासनांची पूर्तता होत नसल्याचे त्यांचे म्हणणे असून आश्वासनाच्या अंमलबजावणीची मागणी केली आहे. त्यात सरकारने अण्णासाहेब पाटील महामंडळाला निधी जाहीर करीत मराठा समाजाला दिलासा देण्याचा प्रयत्न आहे.

**त्र्यंबकेश्वरमध्ये पाण्यासाठी......**

समस्येमुळे गावातील मुलांना विवाहासाठी मुली मिळत नसल्याची व्यथा महिलांनी मांडली. आमदार, खासदार, सरपंच निवडणुकीवेळी येतात; पण पाणी आणण्यासाठी मदत का करत नाहीत, असा प्रश्नही आंदोलनकर्त्यांनी केला. आंदोलनादरम्यान महिलांनी विहिरीतील दूषित पाण्याच्या बाटल्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दाखवत हे पाणी पिऊन दाखवा, असा आग्रह केला. आंदोलनकर्त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची गाडी अडवून जाब विचारला. त्यानंतर त्यांनी अर्ध्या तासात परत येऊन बैठक घेण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलनकर्त्यांनी गाडी जाऊ दिली. यावेळी राजू देसले, प्राजक्ता कापडणे, मनोहर पगारे, लता जाधव, सोनाली जाधव, अनिता जाधव, सुनीता रामसे, मथुरा तिवारी आदी उपस्थित होते.



**नंदुरबार ।** शहरात पेट्रोल व डिझेल विक्री करणाऱ्या सर्वच पंपावर बुधवारी मोठ्या प्रमाणावर रांगा लागल्या होत्या. वाहनधारकांनी मर्यादेपेक्षा जास्त पेट्रोल व डिझेल खरेदी केल्यामुळे पेट्रोल पंप दुपारनंतर बंद झाले होते. इंधनाचे टँकर आल्यावर स्थिती सुरळीत होवू शकते असे पुरवठा विभागातर्फे सांगण्यात आले आहे. दरम्यान नागरीकांनी मागणीपेक्षा अधिक पेट्रोल व डिझेल खरेदी केलयाने ही समस्या निर्माण झाल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

## नंदुरबार येथे रब्बी भरड धान्य खरेदी केंद्राचा शुभारंभ

**प्रतिनिधी । नंदुरबार**

**शासनाचे आधारभुत किंमत खरेदी योजनेंतर्गत रब्बी भरड धान्य खरेदी केंद्राचे उद्घाटन शासकीय धान्य गोदाम नंदुरबार येथे करण्यात आले. भरड धान्य खरेदी केंद्राचे उद्घाटन नायब तहसीलदार प्राजंल पाटील यांचे हस्ते करण्यात आले.**

या उद्घाटनप्रसंगी कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती दीपक मराठे, किशोर पाटील, संघाचे अध्यक्ष बी के पाटील, जिल्हा पणन अधिकारी राजेंद्र इंगळे व्यवस्थापक कृष्णा पाटील, लहु पाटील, रुषिकेश तावरे गोदाम व्यवस्थापक, चंद्रकांत मराठे, शत्रुघ्न मोरे उपस्थित होते. कार्यक्रमाप्रसंगी संघाचे अध्यक्ष बी.के.पाटील यांनी शेतकऱ्यांनी खरेदी विषयी माहिती दिली. ज्वारी मालदांडी ३७४९/– मका २४००/–, बाजरी २७७५/– प्रति विंकटल निश्चित करण्यात आलेला आहे. माल विक्रीसाठी आणतांना स्वच्छ व कोरडा करुन एफ ए क्यु दर्जाचा आणावा. मालाची आद्रता १४% पर्यंत पाहिजे. माल विक्रीसाठी आणतांना आधारकार्ड शेतकऱ्यांनी सोबत आणावे, असे आवाहन करण्यात आले.

# पवार पेट्रोलियमने पेट्रोलपंपावरच सजवली माणुसकीची पंगत!

## डिझेलसाठी ताटकळणाऱ्या ३०० शेतकऱ्यांना भोजन व्यवस्था; चंदनराव पाटलांची संवेदनशीलता

**प्रतिनिधी । धरणगाव**

**दुपारपासून डिझेलसाठी ताटकळणाऱ्या तब्बल ३०० शेतकऱ्यांना भोजनाची व्यवस्था करीत संकटसमयी चंदनराव पाटील यांच्या संवेदनशीलतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.**



धरणगाव तालुक्यात खरिपाच्या पूर्वमशागतीची लगबग सुरू असून शेतकरी आपल्या शेतातील कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी धडपड करत आहेत. मात्र, शेतीच्या या धावपळीत एकीकडे डिझेलच्या वाढत्या मागणीमुळे शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. अशातच धरणगाव–चोपडा व अमळनेर रस्त्याजवळील पवार पेट्रोलियम येथे डिझेलसाठी दिवसभरापासून मोठ्या प्रमाणात शेतकरी आणि वाहनांच्या रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले. शेतातील मशागतीची कामे थांबू नयेत म्हणून अनेक शेतकरी ट्रॅक्टर, दुचाकी आणि विविध वाहनांसह दुपारपासूनच पेट्रोल पंपावर दाखल झाले होते. मात्र डिझेलचा टँकर रात्री उशिरा, सुमारे दहा वाजेच्या सुमारास येणार असल्याची माहिती मिळताच दिवसभर प्रतीक्षा करणाऱ्या शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर चिंतेची छटा उमटली. उन्हाचा तडाखा, दिवसभराचा थकवा आणि पोटात भुकेची आग अशा परिस्थितीतही बळीराजा आपल्या शेतीच्या कामासाठी शांतपणे थांबलेला होता. याच वेळी एका संवेदनशील निर्णयाने या संपूर्ण प्रसंगाला माणुसकीचा स्पर्श मिळाला. पवार पेट्रोलियमचे संचालक चंदनराव दिलीप पाटील यांनी शेतकऱ्यांची अडचण ओळखत तात्काळ सुमारे ३०० शेतकऱ्यांसाठी पेट्रोल पंपाच्या आवारातच रात्रीच्या भोजनाची व्यवस्था केली. काही क्षणांतच पंप परिसरात आगळेवेगळे दृश्य पाहायला मिळाले. डिझेलच्या प्रतीक्षेत उभ्या असलेल्या वाहनांच्या बाजूलाच पंगती बसल्या, आणि भुकेल्या शेतकऱ्यांना आदराने जेवण वाढले जाऊ लागले. जिथे काही वेळापूर्वी चिंतेचे वातावरण होते, तिथेच काही क्षणांत समाधानाचे, आपलेपणाचे आणि कृतज्ञतेचे वातावरण निर्माण झाले. शेतकरीही या अनपेक्षित मदतीने भारावून गेले. आजच्या धावपळीच्या आणि स्वार्थी युगात संकटात सापडलेल्या माणसाला मदतीचा हात देणे ही दुर्मीळ बाब मानली जाते. मात्र, बळीराजा उपाशी राहू नये या भावनेतून घेतलेल्या या निर्णयाने पवार पेट्रोलियमने केवळ इंधनच नाही, तर माणुसकीचे इंधनही समाजाला दिल्याची भावना परिसरात व्यक्त होत आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.– ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✲ **कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी** (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

शौर्य मराठी — महाराष्ट्राचे निडर दैनिक
epaper.shauryamarathi.com



## दिन विशेष...

१७७२ : सतीची चाल कायदेशीरपणे बंद करणारे व अनेक भाषांतून प्रावीण्य मिळविलेले थोर समाजसुधारक राजामोहन रॉय यांचा बंगालमध्ये जन्म झाला.

१९८९ : 'अग्नी' या मध्यम पल्ल्याच्या क्षेपणास्त्राचे ओरिसातील मंडीपूर येथून यशस्वीरीत्या प्रक्षेपण करण्यात आले.

# जळगाव विधान परिषदेसाठी शिवसेनेत ट्विस्ट!

## भाजप-शिवसेनेत सामना रंगणार? भाजपची कमांड कोअर कमिटीच्या हाती!

प्रतिनिधी । जळगाव

**राज्यातील विधान परिषदेच्या १७ जागांसाठी सोमवारी बिगुल वाजल्यानंतर जळगाव जिल्ह्यात अनेकांनी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. शिवसेनेकडून अगोदरच पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे पुत्र माजी जि.प. सदस्य प्रतापराव पाटील यांचे नाव पुढे आले. मात्र आता आणखी दोन नावे समोर येत असून तिघांमध्ये रस्सीखेच वाढणार आहे. तसेच भाजपमध्ये देखील इच्छुकांची संख्या जास्त असल्याने कोअर कमिटीच्या कोर्टात चेंडून पडला आहे.**

सध्या भाजपचे पारडे जड वाटत असले तरी राज्यात काही जागांची अदलाबदल झाली तर शिवसेनेला जागा सुटू शकते. राज्यात विधान परिषद निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून जळगाव जिल्ह्यात उमेदवार कोण? यावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.



### शिवसेनेच्या गोटात खलबते

जिल्ह्यातील शिवसेनेचे संख्याबळ कमी असले तरी त्यांच्याकडून विधान परिषदेच्या जागेवर दावा करण्यात आला आहे. गेल्या काही दिवसांपासून पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे पुत्र प्रतापराव पाटील यांचे नाव आघाडीवर होते. मात्र, निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर पाचोऱ्याचे आ.किशोर पाटील यांचा मुलगा सुमीत पाटील यांचे नाव देखील चर्चेत आले आहे. मात्र, त्यांना वयाची अडचण येऊ शकते. तसे झाल्यास किशोर पाटील दुसऱ्या उमेदवाराची शिफारस करू शकतात. २०१० मध्ये माजी आमदार मनीष ईश्वरलाल जैन- निखील एकनाथराव खडसे यांच्या विरोधात विधान परिषद निवडणूक लढवत भुसावळचे माजी नगराध्यक्ष अनिल चौधरी यांनी चांगलीच मते घेतली होती. अनिल चौधरी शिवसेनेत प्रवेश करणार असल्याने ते देखील उमेदवारीच्या शर्यतीत असल्याची चर्चा रंगत आहे.

### भाजप कोअर कमिटीच्या कोर्टात चेंडू

भारतीय जनता पक्षाकडे इच्छुकांची यादी मोठी असली तरी संकटमोचक मंत्री गिरीश महाजन यांचा शब्द जिल्ह्यात अंतिम असतो. राज्यातील उमेदवार निश्चित करताना अंतिम निर्णय कोअर कमिटीच घेईल. भाजपाकडून नंदू अडवाणी, डॉ.केतकी पाटील, नंदू महाजन, रोहित निकम, अमोल शिंदे, सूरज झंवर यांची नावे चर्चेत आहेत. मावळते आमदार चंदूभाई पटेल यांचे नाव चर्चेत आल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. भाजप नेहमीप्रमाणे धक्कातंत्र वापरत नवीन चेहरा देखील मैदानात उतरवण्याची शक्यता आहे.

जळगावात उमेदवारीसाठी जोरदार रस्सीखेच सुरु झाली असली तरी संख्याबळ लक्षात घेता भारतीय जनता पक्षाचे वजन जास्त आहे. जळगाव जिल्ह्यात शिवसेनेचे संख्याबळ आणि पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या वैयक्तिक संबंधाच्या बळावर ते देखील या जागेसाठी आग्रही राहू शकतात. जळगाव जिल्ह्यात विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी जिल्ह्यात एकूण ५६४ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदान करू शकणाऱ्या मतदारांची संख्या लक्षात घेता महाविकास आघाडीकडे केवळ ७४ मतदारांचे संख्याबळ असून, अद्याप कोणत्याही संभाव्य उमेदवाराचे नाव समोर आलेले नाही. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका प्रलंबित असल्याने ६८ जिल्हा परिषद सदस्य आणि १५ पंचायत समिती सभापती मतदानापासून वंचित राहणार आहेत. भाजपचे हक्काचे २४९ मतदार असून शिवसेनाकडे २०२ मतदार आहेत.

# संत साई साधाराम साहिब यांना भावपूर्ण श्रद्धांजली

प्रतिनिधी । जळगाव

**पू.साई साधाराम साहिब यांच्यावर सिंध (पाकिस्तान) येथील राहिदकी साहिब येथे संपूर्ण विधीपूर्वक अंत्यसंस्कार करण्यात आले. या प्रसंगी साई साधाराम साहिब यांच्याप्रती आदर आणि शोक व्यक्त करण्यासाठी जळगावमध्ये एका मोठ्या शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यांना यावेळी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.**

साई साधाराम यांच्या निधनामुळे जळगाव शहरातील सिंधी समाजाने आपली दुकाने आणि व्यवसाय पूर्णपणे बंद ठेवून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. या श्रद्धांजली सोहळ्यादरम्यान, साई देविदास यांची विशेष उपस्थिती होती. त्यांनी साई साधारामजींसोबत घालवलेल्या क्षणांना उजाळा दिला. साई साधारामजींच्या पहिल्या भारत भेटीच्या आणि त्यांच्यासोबतच्या भेटीच्या भावनिक आठवणी सांगितल्या. साई साधारामबाबांचे निधन हे संपूर्ण आध्यात्मिक जग आणि सिंधी समाजासाठी कधीही भरून न येणारे नुकसान झाले आहे, असे त्यांनी सांगितले.

जळगाव येथे आयोजित शोकसभेला सर्व स्तरांतील लोक उपस्थित होते. शहरातील सर्व प्रमुख मंदिरांचे प्रतिनिधी, प्रतिष्ठित सिंधी पंचायतींचे वरिष्ठ अधिकारी आणि विचारवंत उपस्थित होते. याशिवाय, राजकीय क्षेत्रातील स्थानिक आमदार राजुमामा भोळे, भरत अमळकर, महापौर दीपमाला काळे, अॅड.सुचिता हाडा, साई देविदास, अमर शहीद संत कंवरम ट्रस्ट यांच्यासह समाजातील इतर मान्यवर आणि अधिकारीही या कार्यक्रमाला उपस्थित राहून पूजनीय साई साधाराम साहिब यांना आदरांजली वाहिली. साई साधाराम बाबा मार्गदर्शक म्हणून कायम राहतील. जळगाव सिंधी समाजाच्या ज्येष्ठ सदस्यांनी सांगितले की, जरी साई साधारामबाबांचे पार्थिव शरीर राहिदकी साहिब (सिंध)च्या पवित्र भूमीत विलीन झाले असले तरी, त्यांचे आशीर्वाद आणि विचार समाजाला सदैव मार्गदर्शन करत राहतील,असे विचार मांडले.

## थोडक्यात

### राष्ट्रवादी शरद पवार गट आज चक्का जाम करणार

**जळगाव ।** ऐन खरीप हंगामाच्या तोंडावर जळगाव जिल्ह्यात डिझेलचा तीव्र तुटवडा निर्माण झाला आहे. शेती मशागतीच्या कामात डिझेलअभावी मोठे विघ्न आले असून, शेतकरी हवालदिल झाला आहे. या गंभीर समस्येवर प्रशासनाने तत्काळ तोडगा न काढल्यास दि. २२ मे रोजी सकाळी ११ वाजेनंतर अत्यावश्यक सेवा वगळता जिल्हाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि मंत्र्यांचे एकही शासकीय वाहन रस्त्यावर फिरू देणार नाही, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रमोद पाटील यांनी दिला आहे. बुधवारी जळगावात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. खरीप हंगामाच्या पूर्वतयारीसाठी शेतकऱ्यांकडे अवघे १५ ते २० दिवस शिल्लक आहेत. आधुनिक काळात शेतीची कामे बैलजोडीऐवजी ट्रॅक्टर आणि आधुनिक यंत्रांच्या साहाय्याने केली जातात. मात्र, जिल्ह्यात ४-४ दिवस डिझेलचे टँकर येत नसल्याने ट्रॅक्टर आणि मळणी यंत्रे जागीच उभी आहेत.

### शिरसोली परिसरातून १४ वर्षीय मुलगी बेपत्ता


**जळगाव । :** तालुक्यातील शिरसोली परिसरातून १४ वर्षीय अल्पवयीन मुलगी संशयास्पदरीत्या बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, शिरसोली येथून १४ वर्षीय अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाली आहे. ही घटना दि. १९ मे रोजी पहाटे ३ वाजेच्या सुमारास उघडकीस आली. याबाबत मुलीचे वडील यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीत म्हटले आहे की, त्यांची मुलगी ही राहत्या घरातून अचानक बेपत्ता झाली असून तिला कोणीतरी अज्ञात इसमाने फूस लावून पळवून नेल्याचा संशय व्यक्त केला आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# जळगाव जिल्हा काँग्रेसमध्ये खांदेपालट

## पूर्व जिल्हाध्यक्ष धनंजय चौधरी; पश्चिम अविनाश भालेराव, महानगराध्यक्ष जमील शेख

प्रतिनिधी । जळगाव





**महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या संघटनात्मक रचनेत मोठे फेरबदल करत अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने नवीन जिल्हाध्यक्षांची घोषणा केली आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी या पुनर्रचनेला आणि नवीन नियुक्तींना मंजुरी दिली आहे. यात पूर्वचे जिल्हाध्यक्ष धनंजय चौधरी तर पश्चिमचे जिल्हाध्यक्ष अविनाश भालेराव, जळगाव महानगराध्यक्षपदी जमील शेख यांची नियुक्ती करण्यात आली आहे.**

संघटन सृजन अभियान अंतर्गत निरीक्षकांनी दिलेल्या अहवालाच्या आधारेनिवड केल्या आहेत. जळगाव जिल्ह्यातील पक्षाच्या तीन महत्त्वाच्या संघटनात्मक विभागांसाठी नवीन अध्यक्षांची घोषणा करण्यात आली आहे. तसेच जळगाव शहराध्यक्षपदी जमील शेख यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जळगाव ग्रामीण पूर्व विभागाच्या अध्यक्षपदाची धुरा धनंजय शिरीष चौधरी यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. जळगाव ग्रामीण पश्चिम विभागाचे नवीन जिल्हाध्यक्ष म्हणून अविनाश भालेराव यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आला आहे. काँग्रेसचे सरचिटणीस के. सी.वेणुगोपाल यांनी पत्रकाद्वारे ही माहिती दिली असून या सर्व नियुक्त्या तात्काळ प्रभावाने लागू करण्यात आल्या आहेत. आगामी काळात जिल्ह्यातील पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी या नवीन नियुक्त्या अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जात आहेत.

# वर्षभर तीव्र पाणीटंचाईमुळे वाघनगरवाशियांची फरफट

## सावखेडा बु।। ग्रामपंचायत प्रशासनाचा नियोजनशून्य कारभार चव्हाट्यावर

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव शहरात पाणी टंचाईचे कोणतेही सावट नसतांना ग्रा.पं.कडून मात्र सावखेडा बुद्रुक ग्रामपंचायत प्रशासनाचा नियोजनशून्य कारभारामुळे वर्षभर तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. परिणामी वाघनगरवाशियांना १० ते १५ दिवसांनी पाणी मिळत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहे. जिल्हा परिषद प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी जिल्हा परिषद प्रशासनाकडे एका निवेदनाद्वारे वाघनगरच्या नागरिकांनी केली आहे.**



जळगाव शहरात उष्णतेची तीव्र लाट असून तापमान ४५ अंशांपर्यंत पोहोचले. अशा परिस्थितीत वाघनगरवाशियांना उकाड्या बरोबरच तीव्र पाणीटंचाईने ग्रासले आहे. वर्षभर १५ दिवसांनी पाणी येत असल्याने नागरिक त्रस्त आहेत. मात्र, यावर लोकप्रतिनिधी, महसूल विभाग, जळगाव जिल्हा परिषद प्रशासन, जिल्हा परिषद ग्रामपंचाय प्रशासन काही उपाय योजना करीत नसल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. जलसाठा व्यवस्थापन तसेच नियमित आणि समान पाणी वाटपाचे कोणतेही वेळापत्रकाचा ग्रामपंचायत अवलंब करीत नाही. परिणामी नागरिकांना दहा ते १५ दिवस पाण्याविना राहावे लागते आहे. या परिस्थितीचा विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना याचा सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे. पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन सभागृहात जिल्ह्यातील पाणीटंचाई व महावितरणकडील विविध विषयांबाबत एप्रिलमध्ये आढावा बैठक पार पडली होती. यामध्ये पालकमंत्र्यांनी वीज खंडित होऊ नये, याबाबत महावितरणाचे अधिकाऱ्यांना विशेष सूचना देऊन विजेचे कारण दर्शवुन नागरिकांना पाणी दिले जाणार नाही, हे कारण सांगु नये, अशा सक्त सूचना दिल्या होत्या. मात्र, सावखेडा ग्रामपंचायत कर्मचारी वारंवार विजेचे कारण सांगून पाणी वेळेवर सोडत नाही. या पाणी टंचाई बैठकीत मात्र एकाही लोकप्रतिनिधीने अथवा प्रशासनाने वाघनगर पाणी टंचाईविषयी चर्चा केली नाही. त्यामुळे वाघनगर परिसरावर प्रशासनानेच बहिष्कार टाकला की काय? अशी चर्चा वाघनगर परिसरातील नागरिकांमध्ये आहे.

### नोकरीच्या आमिषाने तरुणाची ७ लाखांत फसवणूक !

**जळगाव ।** मंत्रालयात क्लर्क पदाची नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून एका तरुणाची ७ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. ज्ञानेश्वर सुनील जाधव (वय ३४, व्यवसाय शेती, रा. मोहाडे, ता. पाचोरा) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. आरोपी शिरीष मंगलनाथ जोशी (रा. पिरोळा, ता. पाचोरा) याच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीनुसार, आरोपीने मंत्रालयात क्लर्क पदावर नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत फिर्यादीकडून टप्प्याटप्प्याने १० लाख रुपये घेतले. मात्र प्रत्यक्षात कोणतीही नोकरी न लावता आरोपीने केवळ ३ लाख रुपये परत केले. पिंपळगाव हरेश्वर पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# रेणुकानगरातील तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या

प्रतिनिधी । जळगाव

**वडिलांचा जेवणाचा डबा देण्यासाठी आई दुकानावर गेलेली असतांना, घरात एकट्याच असलेल्या पीयूष प्रकाश वाणी (वय २०, रा. रेणुकानगर, रामेश्वर कॉलनी) या तरुणाने गळफास घेत आत्महत्या केली. एकुलत्या एक मुलाने आत्महत्या केल्याने त्याच्या कुटुंबियांकडून जिल्हा रुग्णालयात मन हेलावणारा आक्रोश केला. याप्रकरणी एमआयडीसी पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.**




याबाबत माहिती अशी की, शहरातील रामेश्वर कॉलनी परिसरातील रेणुका नगरात पीयूष वाणी हा कुटुंबियांसह वास्तव्यास होता. बुधवारी सकाळच्या सुमारास त्याला अस्वस्थ वाटत असल्याने तो दवाखान्यात जावून आल्यानंतर घरी आराम करीत होता. दुपारी त्याची आई वडिलांना जेवणाचा डबा देण्यासाठी सुभाष चौकात यायचे असल्याने त्यांनी घराला बाहेरुन कडी लावून त्या डबा देण्यासाठी गेल्या. याचवेळी घरी एकट्या असलेल्या पीयूषने राहत्या घरात गळफास घेत आपली जीवनयात्रा संपविली. काही वेळानंतर पीयूषची आई घरी गेली असता, त्यांना पीयूष हा गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आला. घरात शिरताच मुलाचा गळफास घेतलेला मृतदेह पाहून आईने हंबरडा फोडला. त्यानंतर परिसरातील नागरिकांच्या मदतीने पीयूषला तात्काळ जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी तपासणीअंती पीयूषला मयत घोषित केले. पीयूष हा आईवडिलांचा एकुलता एक मुलगा होता. त्याने आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेतल्यामुळे त्याच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला. पीयूषच्या आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. याप्रकरणी एमआयडीसी पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# हितेंद्र टेकावडेंनी केली स्मशानभूमीच्या ओट्याची स्वच्छता

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील नेरीनाका स्मशानभूमीत अंत्ययात्रेनिमित्त गेलेल्या हितेंद्र टेकावडे यांनी तेथील विसाव्यासाठी असलेल्या ओट्याची अस्वच्छ अवस्था पाहून स्वतः पुढाकार घेत स्वच्छता मोहीम राबविली.**




नेरीनाका स्मशानभूमीत नैवेद्य, कणिक पीठ, तेल-तुपाचे दिवे, फुले, अगरबत्ती तसेच इतर साहित्यामुळे ओटा तेलकट व अस्वच्छ झाला होता. परिसरात गुलाल व पिठामुळेही घाण पसरली होती. ही परिस्थिती पाहून सामाजिक जाणिवेतून प्रेरित होत हितेंद्र टेकावडे यांनी दुसऱ्याच दिवशी सकाळी लवकर नेरीनाका स्मशानभूमीत जाऊन ओटा व परिसराची स्वच्छता केली. सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवणे ही प्रत्येकाची जबाबदारी असून,स्मशानभूमीतील ओट्याची स्वच्छता करण्याचे भाग्य लाभल्याची भावना हितेंद्र टेकावडे यांनी व्यक्त केली. हे कार्य त्यांनी ईश्वरी सेवा मानत समाजात सकारात्मक बदल घडविण्यासाठी प्रत्येकाने स्वतः पुढाकार घेण्याची गरज असल्याचे नमूद केले.

तसेच इतरांनीही अशा उपक्रमांतून प्रेरणा घ्यावी, असेही त्यांनी सांगितले. हितेंद्र टेकावडे यांच्या या उपक्रमाचे परिसरातील नागरिकांकडून कौतुक होत असून, सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवण्याबाबत समाजाने अधिक जागरूक होण्याची गरज असल्याची अपेक्षा व्यक्त केली.

# जि.प.शाळांमधील पटसंख्या वाढविण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करावे

## निपुण भारत अभियानांतर्गत आढावा बैठकीत जिल्हाधिकारी रोहन घुगे यांचे आवाहन

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्हा परिषदेच्या शाळा या ग्रामीण तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षणाची गंगा पोहचविण्यात महत्वाची भूमिका वाजवतात. त्यामुळे शिक्षकांनी जिल्हा परिषदेच्या शाळांची गुणवत्ता वाढविण्यासाठी व पटसंख्या वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी केले.**



निपुण भारत अभियानांतर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची आढावा बैठक दि.२१ मे रोजी जिल्हा परिषदेच्या शाहू महाराज सभागृहात आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी उपस्थित केंद्रप्रमुख व मुख्याध्यापकांना मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रणधीर सोमवंशी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी मनोज चौधर, प्राथमिक शिक्षणधिकारी निलेश पाटील, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ.अनिल झोपे, माध्यमिक शिक्षणाधिकारी कल्पना चव्हाण यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी घुगे यांनी जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या निपुण भारत अभियानाच्या अमलबजावणीबाबत आढावा घेतला. यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी म्हणाले की, ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची पहिली पायरी ही जिल्हा परिषदेच्या शाळांपासूनच सुरु होते. जिल्हा परिषदेच्या शाळा म्हणजे खऱ्या अर्थाने नवीन पिढी घडविणारे मंदिर आहे म्हणून येणाऱ्या काळात जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये पटसंख्या वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे. येणाऱ्या काळात पटसंख्या वाढविणाऱ्या शाळांना जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून भरघोस निधी देण्यात येणार आहे व त्यासोबतच जिल्हास्तरावर अशा शाळांचा विशेष गौरव देखील केला जाणार आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांची पटसंख्या वाढ व गुणवत्ता वाढीकडे शिक्षकांनी विशेष लक्ष देऊन मेहनत घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, जिल्ह्यातील एकही शाळा निपुण झाल्याशिवाय राहता कामा नये. त्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करणे गरजेचे आहे. जिल्ह्यात विद्यार्थ्यांची निपुण क्षमता वाढविण्यासाठी विशेष भर देणे आवश्यक आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये फक्त पुस्तकी अभ्यास शिकविला न जाता विद्यार्थ्यांचे अवांतर ज्ञान विकसित होण्याच्या दृष्टीने शिक्षण देणे आवश्यक आहे. यासाठी धोरण निश्चित करून आराखडा तयार करण्याच्या सूचना देखील त्यांनी यावेळी दिल्या. प्रत्येक महिन्याला निपुणबाबत आढावा बैठक जिल्हास्तरावर व तालुका स्तरावर घेण्यात यावी व त्यादृष्टीने नियोजन करावे, अशा सूचनाही त्यांनी या बैठकीत दिल्या. यापुढच्या काळात तालुकास्तरावर मुख्याध्यापक व शिक्षकांच्या बैठका घेण्यात येणार असून या बैठकीत निपुणबाबत आढावा घेतला जाणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. या बैठकीला जिल्ह्यातील केंद्रप्रमुख व सर्व गटशिक्षण अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गोदावरी नर्सिंग महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे उज्ज्वल यश संपादन!

प्रतिनिधी । जळगाव

**गोदावरी नर्सिंग महाविद्यालयाचा बी.एस्सी. नर्सिंग प्रथम सत्राच्या परीक्षेचा निकाल नुकताच घोषीत झाला असून विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.**

महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुण मिळवत संस्थेच्या शैक्षणिक परंपरेला साजेशी कामगिरी केली. या परीक्षेत पायल चंद्रिकापूरे हिने ७६.८ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. गौरी प्रवीण धावले व संस्कृती राहुल पुनवतकर यांनी ७४.८ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला. अक्षदा अरविंद गावित, मयुरी दिनकर कोळी आणि शर्ली स्टिव्हेन्सन यांनी ७२.८ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक प्राप्त केला. ऋषिकेश राजेश्वर गुंड यांनी ७१.२ टक्के गुण मिळवत चौथा क्रमांक, तर तृप्ती पुरुषोत्तम करंगळे हिने ७०.८ टक्के गुणांसह पाचवा क्रमांक मिळविला. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी खा.डॉ.उल्हास पाटील, सचिव डॉ.वर्षा पाटील, सदस्या डॉ.केतकी पाटील, डॉ. वैभव पाटील, प्राचार्य विशाखा गणविर, पालकांनी त्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीमुळे व प्राध्यापकांच्या मार्गदर्शनामुळे हे यश मिळाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. महाविद्यालयाने गुणवत्तापूर्ण शिक्षण, आधुनिक प्रशिक्षण व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिल्यामुळे दरवर्षी विद्यार्थ्यांची यशस्वी परंपरा कायम राहिली आहे. या निकालामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेचा पुन्हा ठसा उमटला आहे.

# ऑनलाइन फार्मसीविरोधात औषध विक्रेत्यांचा बंद

## अमळनेर तालुका औषधी विक्रेता संघाचे तहसीलदारांना निवेदन

प्रतिनिधी । अमळनेर

**ऑनलाइन फार्मसीच्या माध्यमातून होत असलेल्या औषध विक्रीवर तातडीने बंदी घालण्यात यावी, तसेच केंद्र सरकारने कोविड काळात लागू केलेला आदेश मागे घ्यावा, या प्रमुख मागण्यांसाठी अमळनेर तालुका औषध विक्रेता संघाने बुधवारी (दि. २०) एक दिवसाचा कडकडीत बंद पाळत तहसीलदारांना निवेदन दिले.**




तालुक्यातील औषध विक्रेत्यांनी सकाळी १०.३० वाजता विजय मारुती मंदिरापासून तहसील कार्यालयापर्यंत मोर्चा काढला. यावेळी ऑनलाइन फार्मसीविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. मोर्चानंतर तहसीलदार रूपेशकुमार सुराणा यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, देशभरात इंटरनेट फार्मसीच्या माध्यमातून बेकायदेशीररीत्या औषधांची ऑनलाइन विक्री सुरू असून, याबाबत अनेक वेळा शासन आणि प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे. मात्र, शासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने अखेर बंद आंदोलनाचा निर्णय घ्यावा लागला.

ऑनलाइन फार्मसीमुळे नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असून, बंदी असलेली औषधे देखील सहज उपलब्ध होत असल्याचा गंभीर आरोप यावेळी करण्यात आला. डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय औषध पुरवठा होणे हे अत्यंत धोकादायक असल्याचेही विक्रेत्यांनी सांगितले. दरम्यान, बंद काळात रुग्णांना अडचण निर्माण होऊ नये यासाठी अत्यावश्यक सेवेसाठी प्रशासनाकडे संपर्क क्रमांक देण्यात आले होते. शहर व तालुक्यातील २०० हून अधिक औषध विक्रेता दुकानदारांनी या बंदमध्ये सहभाग नोंदविला.यावेळी अमळनेर तालुका औषध विक्रेता संघाचे अध्यक्ष प्रशांत पाटील, उपाध्यक्ष निलेश पाटील, सचिव प्रवीण माळी, खजिनदार रवींद्र चौधरी, जिल्हा प्रतिनिधी नरेंद्र पाटील, सुनील छाजेड, मुरलीधर चौधरी, सचिन चोपडा, हर्षल जैन, महेश पवार यांच्यासह मोठ्या संख्येने औषध विक्रेते उपस्थित होते.

# ऑल इंडिया केमिस्ट बंदला पाचोरा येथे १०० टक्के प्रतिसाद



प्रतिनिधी । पाचोरा

**येथील मेडीकल असोसिएशनने ऑल इंडिया केमिस्ट बंदमध्ये सहभागी होत शंभर टक्के बंद पाळत बंदला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला आहे. देशभरात पुकारलेल्या ऑल इंडिया केमिस्ट बंदला पाचोरा शहरात व परिसरात उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला असून शंभर टक्के बंद पाळण्यात आला आहे.**

सर्व मेडीकल व्यावसायिकांनी आपली मेडीकल दुकाने दिवसभर बंद ठेवली होती. ऑनलाईन औषध विक्री, अवैध ई फार्मसी, व बनावट औषधांचा वाढता धोका, औषध व्यवसायांवर वाढत चाललेले कार्पोरेट वर्चस्व या गंभीर प्रश्नावर एकजूट होऊन पाचोरा येथील औषध विक्रेत्यांनी मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी एक संघ होत प्रयत्न केला. या वेळी शहरातील व ग्रामीण भागातील सर्व मेडीकल बंद ठेवण्यात आल्याचे चित्र दिसून आले. ऑल इंडिया केमिस्ट असोसिएशनचे म्हणणे आहे की, रूग्ण सेवा कायम राहिली पाहिजे , मात्र केमिस्ट व्यवसायही टिकला पाहिजे. अशा प्रकारे भूमिका घेत सर्व औषधे विक्रेत्यांनी आपले व्यवसाय २० मे रोजी बंद ठेवून आपल्या मागण्या शासनापर्यंत पोहचवण्यासाठी प्रयत्न केला आहे. अत्यावश्यक परिस्थितीत रूग्णांना अडचण निर्माण होऊ नये म्हणून वैद्यकीय सेवा व आपत्कालीन सेवा सुरळीत चालू ठेवण्याची माहिती दिली. ऑनलाईन औषध विक्रीमुळे स्थानिक औषध विक्रेत्यांचे अस्तित्व धोक्यात येत आहे. तसेच अनेक ठिकाणी नियमबाह्य पद्धतीने औषध विक्री होत असल्याचे ही आंदोलकांचे म्हणणे आहे. डॉक्टरांच्या सल्लल्याविना मिळणाऱ्या औषधी, बनावट औषधांचा वापर व सुळसुळाट हा रुग्णांच्या आरोग्याशी खेळ आहे. यामुळे शासनाने कठोर भूमिका घ्यावी अशी मागणी करण्यात आली आहे. जळगांव जिल्हा मेडीकल असोसिएशन कडून पाचोरा भडगाव विधानसभेचे आमदार किशोर पाटील यांना देखील निवेदन देत औषध विक्रेत्यांच्या समस्या सोडवण्यासाठी संबंधित मंत्रीमहोदय यांना विनंती करावी अशी विनंती केली आहे. पाचोरा मेडीकल असोसिएशन कडून पाचोरा प्रांताधिकारी भुषण अहिरे तहसीलदार कार्यालयात नायब तहसीलदार विनोद कुमावत, पोलीस निरीक्षक राहुलकुमार पवार यांना निवेदन देण्यात आले या वेळी सर्व औषध विक्रेत्यांची उपस्थिती होती.

## थोडक्यात

### तीन वर्षाच्या चिमुकलीचा वृद्धाकडून विनयभंग

**चाळीसगाव ।** तालुक्यातील एका गावात तीन वर्षाच्या चिमुकलीचा प्रौढ व्यक्तीने अश्लिल चाळे करून विनयभंग केल्याची घटना आज सकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. याप्रकरणी पीडित अल्पवयीन मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तालुक्यातील एका गावात तीन वर्षांची चिमुरडी घराबाहेर खेळत होती. तितक्यात चिमुकलीच्या ओरडण्याचा आवाज आल्याने तिच्या आईने घराबाहेर धाव घे-तली असता मुलगी एका घरात बाथरूममध्ये आढळून आली. हा प्रकार लक्षात येताच महिलेने आरडाओरड केल्याने आसपा-सचे नागरिक धावून आले असता एकाने अश्लिल चाळे करून चिमुकलीचा विनयभंग केल्याचा प्रकार समोर आला. याबाबत पोलिसांना माहिती मिळताच त्यांनी तात्काळ धाव घेत संशयिताला ताब्यात घेतले. मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून शांताराम चैत्राम परदेशी याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वैजापूर येथे आरोग्य शिबीर उत्साहात

प्रतिनिधी । चोपडा

**जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन भायेकर व तालुका आरोग्य अधिकारी डॉ.गिरीश गोसावी तसेच वैद्यकीय अधिकारी डॉ.रोहन मराठे यांच्या आदेशानुसार प्रा.आ.केंद्र वैजापूर अंतर्गत वैजापूर आणि शेनपाणी येथे धरती आबा उन्नत ग्राम योजनेंतर्गत दि. २० मे रोजी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.**



या शिबिरात असंसर्गजन्य आजार - रक्तदाब, रक्तातील साखरेची तपासणी करून सदर लाभार्थ्यांना गोळ्या देखील देण्यात आल्या. तसेच पॅलेटिव्ह केअर रुग्ण भेट, आरोग्य विषयक समुपदेशन, विविध शासकीय योजना व आपले आरोग्य आपल्या हाती अंतर्गत प्रत्येकाने आरोग्य विषयक काय काळजी घेतली पाहिजे याबाबत माहिती देण्यात आली.

### अज्ञात वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यू

**चाळीसगाव ।** चाळीसगाव-नांदगाव रस्त्यावर रोहिणी आणि तळेगावच्या दरम्यान मंगळवारी सकाळी एका अनोळखी इसमाचा छिन्नविछीन्न मृतदेह आढळून आला. कोणतेतरी भरधाव वाहन या इसमाच्या अंगावरून गेल्याने डोके शरीरापासून वेगळे झाल्याचे दिसून आले. या प्रकरणी चाळीसगाव ग्रामीण पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली आहे.

# काजीपुरा रस्त्यावर झाडाला लागली आग
## चोपडा न.पा. अग्निशमन विभागाने वाचवले झाड

प्रतिनिधी । चोपडा

**शिरपूर रस्त्यावरील काजीपुरा फाट्यावरील रस्त्याच्या कडेलाच असलेल्या हिरव्यागार भल्या मोठ्या निंबाच्या वृक्षाला सुमारास कोणीतरी अज्ञात इसमाने आग लावून तिथून पोबारा केला.**



मात्र काही वेळातच झाडाला लागलेल्या आगीने रौद्ररूप धारण केले आणि आगीचे आगडोंब रस्त्यावर पडत होते.शिरपूर रस्त्यावर दुतर्फा वाहतूक थांबली कारण हवेमुळे रस्त्याने ये जा करणाऱ्या प्रवाश्यांच्या अंगावर आगीच्या ठिणग्या पडत होत्या.त्याचवेळी दुचाकीवरून निलेश पाटील राहणार (कुसुंबा)हे जात असतांना त्यांनी समयसूचकता दाखवून सुनील पाटील(वाळकी)आणि मिलिंद सोनवणे पत्रकार यांना दूरध्वनीवर कळवली याची दखल घेत क्षणाचा ही विलंब न करता पत्रकार मिलिंद सोनवणे यांनी नगराध्यक्षा नम्रता सचिन पाटील यांचे सासरे रविंद्र बळीराम पाटील(उद्योजक)यांना सांगितली.त्यांनी लगेचच नगरपरिषदेत कळवून सूचना दिल्या.काहीवेळातच नगरपरिषदेचे अग्निशामकचे प्रमुख उमेश कापरे,गाडीचालक अमीन शिकलीकर,फायरमन भूषण साळुंखे यांनी घटनास्थळी जाऊन आग विझवली आणि रस्त्यावर पडलेल्या झाडाच्या फांद्या ही हटवून रस्ता मोकळा करून दिला. अग्निशमन विभागाने तत्परतेने हिरवे झाड वाचवल्याने त्यांचे कौतुक होत आहे.

# पुणे येथे अंडी उबवणी, कुक्कुटपालन कार्यशाळा

प्रतिनिधी । अमळनेर

**महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र, खडकी (पुणे) येथे दि. ११ मे ते १५ मे दरम्यान अंडी उबवणी व कुक्कुटपालन विषयावर पाच दिवसीय विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत राज्यभरातील सुमारे ७० प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला.**



कार्यशाळेत कुक्कुटपालन विकास, सुधारित अंडी उबवणी तंत्रज्ञान, पक्ष्यांचे संगोपन, लसीकरण आणि आरोग्य व्यवस्थापन याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या प्रशिक्षणासाठी डॉ. दीपक औताडे (कुक्कुटपालन विकास सुधारित अंडी उबवणी ट्रेनर व पशुवैद्यकीय अधिकारी) तसेच डॉ. दीपाली शिरसागर (पशुवैद्यकीय अधिकारी, खडकी पुणे) यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रशिक्षण दिले. प्रशिक्षणादरम्यान एक दिवसाच्या पिलांपासून ते दीड वर्षांच्या पक्ष्यांपर्यंतच्या संगोपनाची माहिती देण्यात आली. विविध वयोगटातील पक्ष्यांना कोणती लस द्यावी, त्यांची आरोग्य काळजी कशी घ्यावी, याबाबत प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात आले. तसेच खान्देशातील सातपुडा भागातील गावरान कोंबडीच्या विशेष जाती विकसित करून शेतकऱ्यांना जोडधंद्यातून आर्थिक लाभ मिळवून देण्याच्या संधींबाबतही माहिती देण्यात आली. या कार्यशाळेत अमळनेर तालुक्यातील मांडळ येथील डॉ. दीपक पंढरीनाथ पाटील (पशुधन पर्यवेक्षक व माजी सभापती पंचायत समिती अमळनेर) यांनी एक दिवसाच्या पिलांचे यशस्वी लसीकरण करून दाखवत विशेष प्रात्यक्षिक सादर केले. त्यांच्या या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत समारोप कार्यक्रमात त्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

# किरकोळ कारणावरुन तरुणाची हत्या

प्रतिनिधी । बोदवड

**चोरीचा संशय व्यक्त केल्याच्या कारणावरून एका तरुणाची धारदार शस्त्राने वार करून निर्घृण हत्या करण्यात आली. अन्सार पिंजारी असे मृत पावलेल्या दुर्दैवी तरुणाचे नाव आहे.**



या घटनेमुळे तालुकक्यात खळबळ उडाली आहे. शहरात कमालीचे तणावाचे वातावरण आहे. काही दिवसांपूर्वी अन्सार पिंजारी यांच्या घरात चोरीची घटना घडली होती. या चोरीमागे अरबाज शाह याचाच हात असावा, असा संशय अन्सारने व्यक्त केला होता. आपल्यावर चोरीचा संशय घेतल्याचा तीव्र राग अरबाजच्या मनात होता आणि या वादाचे पर्यावसान बुधवारी मोठ्या भांडणात झाले. अरबाज शाह याने अन्सारवर धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला चढवला. हा हल्ला इतका भीषण होता की, गंभीर जखमी झालेला अन्सार जागीच रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. आणि त्याचा मृत्यू झाला. हत्येच्या या घटनेची माहिती मिळताच बोदवड स्थानिक पोलिसांसह जळगावचे अप्पर पोलीस अधीक्षक संदीप गावित तातडीने बोदवड येथे घटनास्थळावर दाखल झाले. त्यांनी घटनास्थळाची बारकाईने पाहणी करून सूचना केल्या. घटनेनंतर संशयित आरोपी अरबाज शाह हा फरार झाला असून, बोदवड पोलीस आणि गुन्हे शाखेची पथके त्याच्या शोधासाठी रवाना करण्यात आली आहेत. याप्रकरणी बोदवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान घटनेची माहिती मिळताच आमदार चंद्रकांत पाटील यांनी बोदवड गाठत मृताच्या परिवाराचे सांत्वन केले.

# मांडळ ग्रामसेवकाविरोधात तक्रार; आमरण उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी । अमळनेर

**तालुक्यातील मांडळ गावातील ग्रामसेवकाच्या कार्यपद्धतीविरोधात ग्रामस्थांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) चे अमळनेर तालुका उपाध्यक्ष वासुदेव भालेराव पवार (वासू मामा) यांनी बीडीओ यांच्याकडे लेखी निवेदन सादर केले आहे.**



निवेदनात ग्रामसेवक प्रांजल वाघ यांच्यावर नागरिकांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे न देणे, अरेरावीची भाषा वापरणे तसेच ग्रामपंचायत अंतर्गत मंजूर विकासकामांची माहिती न देण्याचे आरोप करण्यात आले आहेत.

विशेषतः मांडळ गावातील अंडरग्राऊंड गटारीच्या कामाबाबत नागरिकांनी विचारणा केल्यानंतरही संबंधित योजना, मंजुरी, अंदाजपत्रक व खर्च यांची माहिती दिली जात नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच गावातील गरीब नागरिकांना घरपट्टी, नळपट्टी आदी बाबींमध्ये त्रास दिला जात असल्याचा मुद्दाही निवेदनात नमूद करण्यात आला आहे. ग्रामपंचायत कार्यालयात नागरिकांचा अपमान होत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या संदर्भात तहसीलदार आणि बीडीओ यांनी चौकशी करावी, अशी विनंती करण्यात आली आहे. दरम्यान, संबंधित प्रकरणाची चौकशी न झाल्यास ग्रामस्थ ग्रामपंचायत कार्यालयासमोर ग्रामसेवकांच्या विरोधात आमरण उपोषणास बसतील, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. हे निवेदन वासुदेव भालेराव पवार, तालुका उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांच्या स्वाक्षरीने सादर करण्यात आले आहे.

# शहरातील शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची प्रक्रिया सुरू करा

## उपविभागीय अधिकारी मयुर भंगाळे यांचे प्रशासनाला निर्देश

प्रतिनिधी । चोपडा

**महाराष्ट्र शासनाच्या दि. २५ मार्च २०२६ रोजीच्या महत्वपूर्ण शासन निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी चोपडा शहरातील शासकीय जमिनीवरील दि. १ जानेवारी, २०११ पर्यंत अस्तित्वात असलेल्या निवासी अतिक्रमणांचे नियमितीकरण करण्याबाबत उपविभागीय अधिकारी अमळनेर, मयुर भंगाळे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत चोपडा तहसीलदार भाऊसाहेब थोरात व चोपडा नगरपरिषद मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांच्यासह नगरपरिषद अधिकारी उपस्थित होते.**




या बैठकीत चोपडा शहरातील विविध भागांमधील शासकीय जमिनी, त्यावरील निवासी अतिक्रमणांची स्थिती व आरक्षणे तसेच शासन निर्णयानुसार पात्रतेच्या अटी याबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. पात्र लाभार्थ्यांना नियमितीकरण प्रक्रियेचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही गतिमान करण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

नागरिकांमध्ये योजनेबाबत जनजागृती निर्माण व्हावी, यासाठी शहरातील विविध प्रमुख ठिकाणी माहितीपर बॅनर लावणे तसेच घंटागाडी व इतर प्रसार माध्यमांद्वारे प्रचार करण्याची सूचना करण्यात आली. संबंधित नागरिकांना अर्ज सादर करण्याची प्रक्रिया सुलभ व्हावी, यासाठी तात्काळ अर्ज वितरण सुरू करण्याबाबत सूचना करण्यात आली. तसेच नागरिकांना आवश्यक मार्गदर्शनासाठी तात्काळ स्वतंत्र मदत कक्ष सुरू करण्याबाबत आदेशित केल्यानुसार उपविभागीय अधिकारी, अमळनेर यांच्या उपस्थितीत अतिक्रमण नियमानुकूल मदत कक्ष कार्यान्वित करण्यात आला. मदत कक्षामार्फत नागरिकांना अर्ज भरणे, आवश्यक कागदपत्रांची माहिती, पात्रतेच्या अटी तसेच प्रक्रियेबाबत मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाणार आहे. यावेळी काही नागरिक अर्ज आणि आवश्यक कागदपत्रे याबाबत चौकशी करिता आले असता उपविभागीय अधिकारी, अमळनेर यांच्या हस्ते त्यांना अर्ज वितरीत करण्यात येऊन सदर अर्ज जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचविण्याचे सूचित करण्यात आले.

# अमळनेरात डुकरांचा उच्छाद

प्रतिनिधी । अमळनेर

**अमळनेर शहरात मागील काही दिवसांपासून मोकाट डुकरांचा मोठ्या प्रमाणात उपद्रव वाढला असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. विशेषतः डीपी रस्ता (८० फुटी) रस्त्याच्या परिसरात डुकरांचे कळप मुक्तपणे फिरत असल्याने सकाळी मॉर्निंग वॉक तसेच सायंकाळी फेरफटका मारण्यासाठी जाणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.**

अचानक डुकरांच्या हल्ल्यामुळे नागरिक जखमी होण्याच्या घटना सातत्याने घडत असून प्रशासन मात्र सुस्त असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

मागील आठवड्यात शहरातील सेवानिवृत्त मुख्याध्यापक गोसावी सर हे डीपी रस्त्यावर फिरत असताना मोबाईलवर बोलत होते. त्यावेळी मागून आलेल्या डुकराने अचानक त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले असून त्यांच्या दोन्ही पायांना फ्रॅक्चर झाले आहे. तसेच डुकराच्या चाव्यामुळे त्यांच्या पायांवर २५ ते ३० टाके पडले आहेत. प्राथमिक उपचारानंतर धुळे येथील ग्रामीण रुग्णालयात त्यांना लसीकरण करण्यात आले असून सध्या त्यांच्यावर धुळे येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.